# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping women in distress situation**

**Police Station** :- **Jaulka**

**Date of Good Work done** :- **01/11/2022**

**Brief of the work done :-**

पो.स्टे. जऊळका येथे दाखल विनयभंगाच्या गुन्ह्यात आरोपीला दोन वर्ष कारावास ; महिलांविरुद्धच्या गुन्ह्यात आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा व्हावी यासाठी वाशिम पोलीस दल प्रयत्नशील.

लोकमत

## विनयभंग केला अन् २ वर्षांचा कारावास झाला

### मालेगाव दिवाणी न्यायालयाचा निर्णय

लोकमत न्यूज नेटवर्क

**जऊळका रेल्वे :** जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यात एका महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी आरोपी संतोष जितासिंग राठोड याला मालेगावसह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) पी. यू. कुळकर्णी यांनी १ नोव्हेंबर रोजी दोन वर्षांच्या साध्या कारावासासह २ हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा ठोठावली आहे.

मालेगाव तालुक्यातील जऊळका येथील पोलीस स्टेशनमध्ये आरोपी संतोष जितासिंग राठोड (रा. राजाकिन्ही) याने एका महिलेचा विनयभंग केल्याची घटना १६ मार्च २०१४ रोजी घडली होती. या प्रकरणी आरोपीवर या प्रकरणी पिडीतेच्या तक्रारीवरुन जऊळका पोलिसांत गुन्हा दाखल करून मालेगाव प्रथम वर्ग न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात आले होते. या प्रकरणाची सुनावणी १ नोव्हेंबर रोजी करण्यात आली.

तपास अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात पोलीस कॉन्स्टेबल विष्णू डिंडरकर यांनी कोर्ट पैरवी केली. या प्रकरणी सहदिवाणी न्यायाधीश (क.स्तर) पी. यू. कुळकर्णी यांनी निकाल देताना आरोपी संतोष जितासिंग राठोड यास दोन वर्षांच्या साध्या कैदेसह २ हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा ठोठावली.

सरकारी अभियोक्ता म्हणून एपीपी भास्कर इंगळे यांनी काम बघितले.